ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ — पुणें, बुधवार तारीख १४ जानेवारी, १९५९ — अंक १

## विविध माहिती

**रशिआची इंडोनेशिआला मदत**—रशिआ आणि इंडोनेशिआ ह्या देशांच्या दरम्यान व्यापारी करार करण्यांत आला आहे. रशिआनें इंडोनेशिआला भलें मोठें कर्ज देऊं केलें असून त्याच्या साह्यानें इंडोनेशिआंत पोलादाचे दोन कारखाने उभारण्यांत येणार आहेत. त्याशिवाय एक खताचा कारखाना उभारण्यांत येणार असून इंडोनेशिआंतील रस्त्यांचा विकासहि करण्यांत येणार आहे.

**अमेरिकन वकिलातीची नवी इमारत**—दिल्ली येथील चाणक्यपुरींत भारतामधील अमेरिकन वकिलातीची भव्य इमारत बांधण्यांत आली आहे. इमारत बांधण्याच्या कामीं ज्या कामगारांनीं विशेष कौशल्य दाखविलें त्यांना पारितोषिकें देण्यांत आलीं. इमारतीसाठी १·२५ कोटी रुपये खर्च आला आहे. शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी खास व्यवस्था करण्यांत आली आहे. हवा सुखद राहणारीं दालनेंहि बांधण्यांत आलीं आहेत.

**काँग्रेसच्या अधिवेशनाचा खर्च**—नागपूर येथें भरविण्यांत आलेल्या काँग्रेसच्या ६४ व्या अधिवेशनासाठीं उभारण्यांत आलेल्या अभ्यंकर-नगरासाठी २५ लाख रुपये खर्च आला असावा असा अंदाज आहे. ६०० टन वजनाच्या पत्र्यांनाच १० लाख रुपये द्यावे लागले आहेत. त्याशिवाय नगराच्या ८ प्रवेशद्वारांना प्रत्येकी ५०,००० रुपये खर्च लागला आहे.

**मंत्र्यांना मिळालेल्या देणग्या**—सीलोन सरकारच्या मंत्र्यांना व पार्लमेंटरी सेक्रेटरींना त्यांच्या अधिकारपदामुळें ज्या देणग्या मिळालेल्या असतील त्या राज्याच्या मालकीच्या झाल्या पाहिजेत असा निर्णय सिलोनच्या ऑडिटर-जनरलनें दिला आहे. पार्लमेंटच्या पब्लिक अकौंटस कमिटीनें आपल्या अहवालांत हा निर्णय योग्य असल्याचें मत प्रकट केलें आहे.

**विमा-नोकरांना बोनस**—आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांनीं कॉर्पोरेशनच्या नोकरांना मोफत विमापत्रकाच्या ऐवजीं एक महिन्याच्या मूळ पगाराइतका बोनस देण्याची तयारी दाखविली आहे. कॉर्पोरेशनच्या नोकरांची मागणी दोन महिन्यांच्या पगाराइतक्या बोनसची आहे. बोनस देण्यास असलेला तात्त्विक विरोध आतां संपलेला आहे.

**ब्रिटनची अणुशक्तीचलित पाणबुडी**—ब्रिटन अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी बांधीत आहे. तिचा आकार पहिल्या अमेरिकन अणुशक्तीचलित पाणबुडीपेक्षा मोठा असेल आणि गतीहि अधिक असेल. तीवर अग्निबाण ठेवण्याची व्यवस्था असणार नाहीं. बोटीचें नांव 'ड्रेडनॉट' ठेवण्यांत येईल.

**दडवलेलें उत्पन्न बाहेर आलें**—दडविलेलें उत्पन्न ३१ डिसेंबरच्या आंत सरकारजवळ कबूल केलें तर लोकांविरुद्ध कारवाई करण्यांत येणार नाहीं, असें आश्वासन पाकिस्तान सरकारनें दिलें होतें. ह्या सवलतीचा उपयोग होऊन पाकिस्तानांत ९५ कोटी रुपयांचें दडविलेलें उत्पन्न बाहेर आलें. परदेशीय चलनाच्या बाबतींत मात्र अपेक्षेप्रमाणें यश आलें नाहीं.

**चंद्रवेधी अग्निबाणाचें लष्करी महत्त्व**—रशिआनें सोडलेल्या चंद्रवेधी अग्निबाणानें चंद्राजवळच्या ५,००० मैलांच्या परिसरांत उड्डाण केलें. ह्या घटनेला लष्करी निरीक्षक विशेष महत्त्व देत आहेत. रशिआजवळ खंडांतर्गत प्रवास करणारे अग्निबाण असतील तर ते आपल्या लक्ष्यावर अचूक जाऊन पडतील, असें मानण्यास आतां भरपूर पुरावा उपलब्ध झाला आहे.

**कायदेपंडितांची आंतरराष्ट्रीय परिषद**—दिल्ली येथें कायदेपंडितांची आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यांत आली होती. आशिआ खंडांत भरलेली अशा प्रकारची ही पहिलीच परिषद आहे. परिषदेला ५० देशांचे प्रतिनिधी हजर होते. इंटरनॅशनल कमिशन ऑफ ज्यूरिस्टस ह्या संस्थेनें 'कायद्याचें राज्य' ह्या विषयासंबंधीं निरनिराळ्या देशांना एक प्रश्नपत्रिका धाडली होती. तिला देण्यांत आलेल्या उत्तरांविषयीं परिषदेंत चर्चा झाली.

**रेल्वेच्या सवलतींचा दुरुपयोग**—सध्यां २५ अगर अधिक लोकांनीं आपली सोसायटी रजिस्टर केली तर त्यांना रेल्वेकडून प्रवासभाड्यांत सवलती मिळतात. ह्या सवलतींचा दुरुपयोग करून रोटरी क्लबाच्या सभासदांनींहि प्रवास केल्याचें आढळून आलें. त्यामुळें रेल्वेप्रवासाबाबत मिळणाऱ्या सवलतींच्या नियमांत दुरुस्ती करण्याचा विचार सरकार करीत आहे.

**पश्चिम जर्मनीचें भारताला कर्ज**—भारताचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडण्यास मदत व्हावी म्हणून पश्चिम जर्मनीनें ४ कोटी डॉलर्सचें दीर्घ मुदतीचें कर्ज देण्याचा करार केला आहे. गेल्या ऑगस्टमध्यें भारताच्या धनकोंची वॉशिंग्टनला जी परिषद भरली होती तींत धनकोकडून मिळावयाच्या संयुक्त मदतीच्या ३५ कोटी डॉलर्सपैकी ४ कोटी डॉलर्स देण्याचें पश्चिम जर्मन सरकारनें कबूल केलें आहे.

**मिकोयान ह्यांचा अमेरिकेचा दौरा**—रशिआचे उपपंतप्रधान मि. मिकोयान अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. सामान्यतः रशिअन सरकारच्या अधिकाऱ्यांना अगर रशिअन नागरिकांना अमेरिकेंतील कांहीं भागांत जातां येत नाहीं. परंतु रशिअन सरकारच्या विनंतीवरून मि. मिकोयान ह्यांना ह्याहि भागांत मोकळेपणानें हिंडण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

## जागतिक मंत्रिमंडळांत कोणकोण असावेत ?

पृथ्वीचें अंतराळांतून होणाऱ्या आक्रमणापासून संरक्षण करण्याचा प्रसंग निर्माण झाला, तर मंत्रिमंडळांत कोण कोण असावेत ? असा प्रश्न लंडन येथील डेली एक्सप्रेस ह्या वृत्तपत्रानें आपल्या वाचकांना विचारला. तेव्हां निकिता क्रुश्चेव्ह, रशियन पंतप्रधान, ह्याला प्रस्तुत मंत्रिमंडळाचें पंतप्रधान करावें, असें बहुमत पडलें. बाकीच्या जागीं खालील पुढाऱ्यांची निवड झाली. परराष्ट्रमंत्री : अद्लाई स्टीव्हनसन ( डेमोक्रॅटिक पक्षाचा गेल्या अध्यक्षीय निवडणुकींतील उमेदवार ), अर्थमंत्री : प्रो. लडविग अरहार्ड ( प. जर्मनीचा व्हाइस चॅन्सेलर ), संरक्षणमंत्री : जनरल द गॉल ( फ्रान्सचा अध्यक्ष ), व्यापार मंत्री : मिकियॉन ( रशियाचा फर्स्ट डेप्युटी मिनिस्टर ), कामगारमंत्री : ॲन्युरिन बेव्हन ( ग्रेटब्रिटनमधील विरोधी पक्षाचा नेता ), शेतकीमंत्री : हॅरोल्ड मॅकमिलन ( ब्रिटिश पंतप्रधान ), आरोग्यमंत्री : मेंझीस ( ऑस्ट्रेलियाचा पंतप्रधान ).

## टेनिस खेळण्याच्या धंद्यांतील प्राप्ति

ॲशले कूपर हा २२ वर्षांचा ऑस्ट्रेलियन टेनिस-पटु जॅक क्रेमरच्या नेतृत्वाखालील चमूंत धंदेवाईक खेळाडू म्हणून दाखल झाला आहे. ॲशले कूपर हा आजच्या जगांतील पहिल्या अनुक्रमाचा खेळाडू आहे. तीन वर्षे तो क्रेमरच्या चमूंत देशो-देशीं हिंडून टेनिस खेळील. त्यासाठीं त्याला किमान सुमारें ५ लक्ष रु. मिळतील आणि ही रक्कम त्याच्या खेळाच्या दर्जाप्रमाणें १० लक्ष रुपयांवरहि जाऊं शकेल. अँडरसन ह्या ऑस्ट्रेलियन खेळाडूनेंहि धंदेवाईक म्हणून खेळण्याचें ठरविलें आहे. गेल्या महायुद्धानंतर अकरा ऑस्ट्रेलियन टेनिसपटूंनीं टेनिसवर ह्या रीतीनें पैसे मिळविले आहेत. डेव्हिस कप सामन्यांत अर्थातच धंदेवाइकांना भाग घेतां येत नाहीं. त्यामुळें ऑस्ट्रेलियाला तो कप स्वतःकडे राखणें ह्यापुढें कांहीं वर्षें अवघड जाईल.

## नवीन कारखाने निघूनहि साखरेचें उत्पादन घटलें

१९५७-५८ मध्यें हिंदी साखर कारखान्यांनीं १९,७७,००० टन साखरेचें उत्पादन केलें. १९५६-५७ मधील उत्पादनापेक्षा ते ४६,००० टनांनीं कमी भरलें. १९५७-५८ मध्यें नव्यानें सुरू झालेल्या साखर कारखान्यांनीं १,४०,००० टन साखरेची भर घातली, हें लक्षांत घेतलें म्हणजे उत्पादनांतील घट विशेष लक्षांत येते. उसाचा विनियोग खंडसारी साखरेकडे उत्तर प्रदेशांत मोठ्या प्रमाणावर करण्यांत आल्यामुळें त्या साखरेचें उत्पादन खूपच वाढलें

## कॉंग्रेसचे प्राथमिक सभासद

सुमारें ४६,००,००० लोक कॉंग्रेसचे प्राथमिक सभासद आहेत. उत्तर प्रदेशांत सर्वांत जास्त म्हणजे ६,४८,२७४ सभासद आहेत. त्याखालोखाल बिहार (६,३४,५४०) व राजस्थान (५,०२,८००) ह्यांचा अनुक्रम लागतो. मुंबई, हिमाचल, तामिलनाड ह्यांत प्रत्येकीं १,००,००० पेक्षा कमी सभासद आहेत. कम्युनिस्टांचा प्रभाव असलेल्या केरळमध्यें १,७३,८७१ सभासद आहेत.




आगामी प्रकाशन


मधुमालतीनुं सौंदर्य

मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

गुजराती अनुवादक:
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.

प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १४ जानेवारी, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआच्या मदतीनें तेलशुद्धीचा कारखाना

बिहारमध्यें बरोनी येथें उभारावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी रशिआशीं बोलणीं करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. हा कारखाना सार्वजनिक विभागांतील राहील. संकल्पित कारखान्यांतून दरसाल १० लाख टन अशुद्ध तेल शुद्ध करण्यांत येईल. कारखाना १९६२ च्या मार्चपर्यंत पुरा होण्याचा संभव आहे. त्याशिवाय रुमेनिआच्या आर्थिक व तांत्रिक मदतीनें आसाममध्यें उभारण्यांत येणार असलेला तेलशुद्धीचा कारखाना १९६१ च्या मार्च महिन्यांत उत्पादन करूं लागणार आहे. रशिआनें कारखाना उभारण्याच्या कामीं विशेष सवलतीच्या अटी सुचविल्याची वार्ता आहे. म्हणून रशिआलाच हें काम देण्यांत येईल असें दिसतें. तथापि तांत्रिक साह्याबद्दल रशिआनें ज्या सूचना केल्या आहेत, त्याबद्दल तपशीलवार वाटाघाटी करण्यांत येणार आहेत. बरोनी येथील कारखाना उभारण्याच्या कामीं अमेरिका व ब्रिटन ह्यांनींहि औत्सुक्य दाखविलें होतें. पण त्यांच्याकडून प्रत्यक्ष आराखडे आलेले नाहींत. त्याशिवाय ऑस्ट्रिआ व इटली ह्या देशांकडूनहि कारखान्याच्या उभारणीविषयीं चवकशी करण्यांत आली होती. पण सर्वांत रशिआकडून अधिक सवलतीच्या अटी मिळाल्या आहेत. आसाममध्यें उभारण्यांत येणारा कारखाना गोहाटी येथें उभारण्यांत येईल असें दिसत नाहीं. गोहाटीमध्यें कारखान्यासाठी जेमतेम ५० एकर जमीनच मिळण्याची शक्यता आहे. कारखान्याला निदान २५० एकर जमीन लागणार आहे. त्यामुळें गोहाटीला कारखाना काढतां येणार नाहीं. कारखान्यासाठी जागा निवडणारी कमिटी आसामच्या दौऱ्यावर आहे. तिच्या शिफारसी आल्यावर जागा निश्चित होईल. गोहाटीच्या उत्तरेस ७५ मैलांवर असलेल्या एका ठिकाणची कमिटीकडून निवड होण्याची शक्यता आहे.

---

## ब्रिटनच्या निर्यातींत घट होण्याचा संभव

ब्रिटनच्या निर्यात व्यापारांत नजिकच्या भविष्यकालांत आणखी घट होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. कारण प्राथमिक स्वरूपाचा कच्चा माल पुरविणाऱ्या देशांनीं आपली आयात कमी केली आहे. गेल्या महिन्यांत कच्चा माल पुरविणाऱ्या देशांना ब्रिटनहून माल घेऊन जाणाऱ्या बोटींच्या संख्येंत थोडीशी वाढ झाली आहे. परंतु त्यामुळें निर्यात फारशी सुधारण्याचा संभव नाहीं, उलट उद्योगप्रधान देशांना अधिक निर्यात करण्यांत आली तरच परिस्थिति सुधारण्याची शक्यता आहे. गेल्या कांहीं महिन्यांत अमेरिकेला करण्यांत येणाऱ्या मालाच्या निर्यातींत वाढ झालेली आहे. ही घटना उत्तेजक मानण्यांत येत आहे. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत त्यामागील ह्याच कालाच्या मानानें ब्रिटनची अमेरिकेला करण्यांत येणारी निर्यात २९ टक्क्यांनीं अधिक झाल्याचें दिसून आलें आहे. १९५८ मध्यें एकंदरीनें १९५७ च्या मानानें निर्यातींत घटच झाली आहे. पहिल्या पांच महिन्यांत ही घट अवघी २ टक्के होती. पण पुढील तीन महिन्यांत ती ७ टक्क्यांपर्यंत वाढली. त्यानंतर मात्र परिस्थितींत किंचित् सुधारणा झाली. गेल्या कांहीं महिन्यांतील परिस्थितीवरून ही सुधारणा टिकून राहील असें वाटत आहे; परंतु आर्थिक घडामोडींचे अभ्यासक असें म्हणत आहेत कीं गेल्या वर्षीं ब्रिटनमधील उद्योगधंद्यांची अवस्था निर्यातीला विशेष पोषक होती, तशी ती ह्या वर्षीं राहीलच असें नाहीं. खुद्द ब्रिटनमधील मालाची मागणी पूर्वीसारखी राहिली नसल्यामुळें परदेशी निर्यात करण्याची वृत्ति अधिक दिसून येत आहे. वेतनाची वृद्धि झपाट्यानें होत नसल्यामुळें आणि परदेशी मालाच्या किंमती घटल्यामुळें निर्यात मालाच्या किंमती बऱ्याचशा स्थिर राहिल्या आहेत.

---

## भारत व संयुक्त-अरब-संघ ह्यांचा व्यापार

संयुक्त-अरब-संघ राज्याच्या व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ भारताच्या दौऱ्यावर आलें आहे. उभयतांमध्यें होणाऱ्या व्यापारी देवाण–घेवाणीचें सध्यांचें जें स्वरूप आहे त्याच्या पलीकडे व्यापाराची वृद्धि करण्याच्या हेतूनें हें मंडळ आलेलें असून त्याचें पुढारीपण इजिप्तकडे आहे. उभयपक्षीं व्हावयाच्या व्यापारांत खरा प्रश्न परदेशीय चलनाचा आहे. १९५८ च्या मार्चमध्यें इजिप्त व भारत ह्यांच्यांत जो करार झाला त्याप्रमाणें उभयतां देशांच्या परंपरागत निर्यात व्यापारांत समतोलपणा राखण्याचें ध्येय ठेवण्यांत आलें होतें. निर्यात व्यापारांत भारत इजिप्तला मुख्यतः चहा आणि ताग पाठवितो आणि इजिप्तकडून कापूस आयात करतो. पण, अलीकडे भारतांत औद्योगिक माल तयार होऊं लागला असून इजिप्तची अशा मालाची बरीच गरज त्याला भागवितां येईल. कैरो येथील इंडियन ट्रेड सेंटरनें इजिप्तच्या सरकारकडून आयात परवाने मिळविले आहेत. भारतांत तयार होणारीं डिझेल एंजिनें, विजेचे पंखे, शिवणाचीं यंत्रें, खोदकामाचे पंप, औषधें इत्यादि माल इजिप्तला पाहिजे आहे व त्यासाठीच ६० लाख रुपयांचे आयात परवाने सरकारनें देऊं केले आहेत. पण, ह्या मालाच्या हिशेबी इजिप्तकडून भारतानें, सूत, सिमेंट इत्यादि नेहमींच्या व्यापारी वळणाच्या बाहेरचा माल घ्यावा असें इजिप्तचें म्हणणें आहे. कांहीं प्रमाणांत व्यापाराचें नवें क्षेत्र उघडणें शक्य आहे आणि भारत तसें करीतोहि आहे. तथापि ठराविक चाकोरीच्या बाहेरील मालाची व्यापारी देवाण-घेवाण उभय पक्षांत अधिक मोठ्या प्रमाणावर करतां येईल काय, असा प्रश्न आहे. उभयता देशांत जो अनेक प्रकारचा माल तयार होतो त्याची तपशीलवार पाहणी केली तरच व्यापारवृद्धीची शक्यता अजमावता येईल आणि इजिप्तर्फे आलेले प्रतिनिधी हेच काम करणार आहेत.

### रेल्वेच्या कमाईत घट होण्याची प्रवृत्ति

भारतामधील विभागीय रेल्वेच्या कमाईत घट होण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. गेल्या ऑक्टोबरमध्यें वहातुकीचे नवे दर जाहीर करण्यांत येऊन त्यांची अंमलबजावणी सुरू झाली. तेव्हांपासून वट्ट कमाईत घट होत असल्याचें दिसून येत आहे. ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक कमिटी कांहीं काळापूर्वी नेमण्यांत आली होती. तिचा अहवाल आतां हातीं आला आहे. अहवालावरून असें दिसतें कीं, रेल्वेची वहातूक आणि रस्त्यानें मोटारींच्या साह्यानें होणारी वहातूक ह्यांच्यांत जी संगति पाहिजे तिचा अभाव आहे. कांहीं रस्ते असे आहेत कीं त्यांच्या शेजारूनच रेल्वेचे फाटे गेलेले आहेत. तरीसुद्धां ह्या रस्त्यावर वहातूक करणाऱ्या मोटार–कंपन्यांना सढळ हातानें परवाने देण्यांत आले आहेत. त्याचा परिणाम रेल्वेनें होणाऱ्या वहातुकीवर झाला आहे. त्याशिवाय इतरहि कारणें नमूद करण्यांत आलीं आहेत. वाईट पिकें, वाढत्या किंमती, अंतर्गत व निर्यात व्यापारांत आलेली मंदी, ह्यांचाहि परिणाम झाला आहे. कापडाच्या वहातुकींत चांगलीच घट झालेली आहे. प्रवासी व मालवहातूक ह्यांच्यांत झालेल्या घटीमुळें रेल्वेपासून मिळूं शकणाऱ्या उत्पन्नाचा मूळचा अंदाज बरोबर न ठरण्याची शक्यता आहे. ह्या अंदाजाप्रमाणें ४०७·४८ कोटी रुपये उत्पन्न गृहीत धरण्यांत आलें होतें. चालू आर्थिक वर्षांत रेल्वेच्या नव्या दराप्रमाणें ११·६ कोटी रुपयांचें अधिक उत्पन्न होईल अशी अपेक्षा करण्यांत आली होती. ऑक्टोबर महिन्यांत रेल्वेला २९·८१ कोटी रुपयांचें उत्पन्न झालें. पण, मागील वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यांत ३१·२८ कोटी रुपयांचें उत्पन्न झालें होतें. मालाच्या वॅगन्स भरण्याची टक्केवारीहि घसरलेली आहे. त्यानंतर नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत परिस्थिति सुधारलेली नाहीं.

**सेवानिवृत्तांच्या पेन्शनमध्यें वाढ**—ज्या सेवानिवृत्त सरकारी नोकरांना मासिक १०० रुपयांपेक्षा कमी पेन्शन मिळत असेल त्यांना दरमहा ६ रुपये अधिक देण्याचें आंध्र प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. ही वाढ हंगामी स्वरूपाची आहे. ह्या पूर्वी २० रुपयांपर्यंत ४ रुपये, २० ते ६० रुपयांपर्यंत ५ रुपये आणि ६० रुपयांच्या पुढें ६ रुपये दरमहा तात्पुरती वाढ करण्यांत आली होती. आतां ही पद्धत बंद झाली आहे.

**वृत्तपत्राच्या कागदाला वाढती मागणी**—कॅनेडिअन पल्प अँड पेपर असोसिएशनचे अध्यक्ष मि. फौलर ह्यांनीं असा अंदाज व्यक्त केला आहे कीं, १९५९ सालीं जगांत कागदाची मागणी आणखी वाढेल. तथापि कागदाच्या गिरण्यांची सर्व उत्पादनक्षमता कारणीं लावण्याइतकी मागणी वाढण्याचा संभव नाहीं. १९५८ मध्यें ८१ टक्के उत्पादनक्षमताच कारणीं लावण्यांत आली.

**फ्रान्सच्या शिक्षणपद्धतींत सुधारणा**—फ्रान्समध्यें अधिक शास्त्रज्ञ, संशोधक आणि तंत्रज्ञ निर्माण व्हावे म्हणून फ्रेंच सरकारनें देशांतील शिक्षणपद्धतींत दूरगामी सुधारणा करण्याचें ठरविलें आहे. माध्यमिक शिक्षणाच्या प्रारंभींच ह्या दृष्टीनें विद्यार्थ्यांचें वर्गीकरण करण्यांत येणार आहे. उन्हाळ्याची तीन महिन्यांची सुटी कमी करण्यांत येणार आहे आणि दोन वर्षांत शिक्षकांच्या संख्येंत ६० टक्के वाढ करण्यांत येणार आहे.

### स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स

( आकडे लक्ष रुपयांचे )

| कॉर्पोरेशन | स्थापना | वसूल भांडवल (३१-३-५८) | वसूल भांडवलाचे हिस्सेदार ( ३१–३–५८ ) राज्य सरकार रक्कम | % | रिझर्व्ह बँक रक्कम | % | इतर संस्था रक्कम | % | इतर रक्कम | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मद्रास | १९४९ | १,२९·५१ | १,०२·०० | ७८·८ | — | — | २७·२३ | २१·० | ०·२८ | ०·२ |
| पंजाब | १९५३ | १,००·०० | ४१·९० | ४१·९ | २०·०० | २०·० | ३४·७५ | ३४·८ | ३·३५ | ३·३ |
| मुंबई | १९५६ | २,००·०० | ५७·०० | २८·५ | ३०·०८ | १५·० | ९८·९० | ४९·५ | १४·०२ | ७·० |
| केरळ | १९५३ | १,००·०० | ६०·४२ | ६०·४ | १५·२५ | १५·३ | २२·२९ | २२·३ | २·०४ | २·० |
| प. बंगाल | १९५४ | १,००·०० | ३१·७७ | ३१·८ | २०·०० | २०·० | ४५·०० | ४५·० | ३·२३ | ३·२ |
| आसाम | १९५४ | १,००·०० | ५१·७० | ५१·७ | २०·०० | २०·० | २५·७५ | २५·८ | २·५५ | २·५ |
| उ. प्रदेश | १९५४ | १,००·०० | ५५·५२ | ५५·५ | १५·०० | १५·० | २७·०० | २७·० | २·४८ | २·५ |
| बिहार | १९५४ | १,००·०० | ४०·०० | ४०·० | १५·०० | १५·० | ३५·०० | ३५·० | १०·०० | १०·० |
| राजस्थान | १९५५ | १,००·०० | ३६·२० | ३६·२ | २१·०० | २१·० | ३८·१५ | ३८·२ | ४·६५ | ४·६ |
| म. प्रदेश | १९५५ | १,००·०० | ५८·३५ | ५८·४ | १५·२० | १५·२ | २०·३० | २०·३ | ६·१५ | ६·१ |
| आंध्र | १९५६ | १,५०·०० | ७०·०० | ४६·७ | २०·०० | १३·३ | ५०·३८ | ३३·६ | ९·६२ | ६·४ |
| ओरिसा | १९५६ | ५०·०० | ३०·०० | ६०·० | १०·०० | २०·० | ८·०० | १६·० | २·०० | ४·० |
| एकूण | | १३,२९·५१ | ६,३४·८६ | ४७·८ | २,०१·५३ | १५·२ | ४,३२·७५ | ३२·५ | ६०·३६ | ४·५ |

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

### मॉडेल को. हौसिंग सोसायटी लि. चा रौप्यमहोत्सव

मॉडेल को. हौसिंग सोसायटी लि. चा रौप्यमहोत्सव बुधवार दि. १४ जानेवारी १९५९ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां माननीय डॉ. ए. यू. शेख, एम. ए., पीएच्. डी., आय. ए. एस., रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, पुणें यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे.

---

### साखर कारखान्यांची मशिनरी भारतांत बनविणार

मशिनरीच्या आयातीवर साखर कारखान्यांची स्थापना अवलंबून आहे आणि हुंडणावळीच्या अडचणीमुळें परदेशांतून यंत्रसामुग्री मागविणें अशक्य झालें आहे. ह्यावर उपाय म्हणून भारतांतच ती यंत्रसामुग्री बनवावी, असें भारत सरकारनें ठरविलें आहे. मेसर्स वालचंदनगर इंडस्ट्रीज, टेक्समॅको आणि जनरल एंजिनिअरिंग कॉर्पोरेशन ह्या कंपन्यांचा गट व मेसर्स के. सी. पी. लिमिटेड, बिनी अँड कंपनी आणि न्यू इंडिया डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या कंपन्यांचा गट, अशा दोन गटांकडे ह्या उत्पादनाचें काम सोंपविण्यांत येईल. नव्या १२ साखर कारखान्यांच्या मशिनरीची ऑर्डर ११ कोटी रुपये किंमतीची होईल.

---

### इंग्लंड-इजिप्त आर्थिक वाटाघाटी

ग्रेट ब्रिटन व इजिप्त ह्यांचेमधील आर्थिक तंटा जागतिक बँकेचे अध्यक्ष, मि. युजिन ब्लॅक, ह्यांच्या मध्यस्तीनें मिटला आहे असें समजतें. ब्रिटिश अर्थखात्यांतील एक अधिकारी, सर डेनिस आर. रिकेट, ह्यांच्या नेतृत्वाखालील एक प्रतिनिधीमंडळ कैरोला जाऊन त्याबाबतच्या करारावर शिक्कामोर्तब करील. लंडन येथें गोठविण्यांत आलेले इजिप्तचे ७५० लक्ष पौंड खुले केले जातील. त्यांपैकी १०० लक्ष पौंड एक-दोन दिवसांतच इजिप्तला उपलब्ध होतील. ब्रिटिश मालमत्तेचें इजिप्तनें राष्ट्रीयीकरण केलें, त्याची किंमत १०० लक्ष पौंडांवरून २५ लक्ष पौंडांवर मान्य करण्यांत आली आहे.

---

### बॉम्बर्सची किंमत त्यांच्या वजनाच्या सोन्यापेक्षाहि अधिक

कांहीं अमेरिकन बॉम्बर विमानांना त्यांच्या वजनाच्या सोन्या-इतकी किंमत पडते, असें प्रेसिडेंट आयसेनहोवरनें नुकतेंच विधान केलें. वास्तविक, त्यानें किंमत कमीच सांगितली! बी ५८ बॉंबर (एअर फोर्स) चें वजन ४७,००० पौंड असून त्याची किंमत २,६७,००,००० डॉलर्स आहे. म्हणजे, प्रत्येक पौंड वजनाला ५६७ डॉलर्स पडले. ४३ जे बॉंबर (नेव्ही) चें वजन २७,००० पौंड असून त्याची किंमत १,७६,००,००० डॉलर्स आहे. म्हणजे, प्रत्येक पौंड वजनाला ६५० डॉलर्स पडले. सोन्याची किंमत अमेरिकेंत ट्रॉय औंसाला ३५ डॉलर्स किंवा एका पौंडाला ५०० डॉलर्स आहे.

---

### पाकिस्तानचें आर्थिक वर्ष अमेरिकेप्रमाणें ?

पाकिस्तान सरकार आपलें आर्थिक वर्ष एप्रिल ते मार्च ऐवजीं जुलै ते जून करण्याचा विचार करीत आहे. कारण, अमेरिकेचें वर्ष जुलै ते जून असें आहे आणि पाकिस्तान सरकारला अंदाजपत्रक करतांना अमेरिकन मदतीची रक्कम कळूं शकेल व त्याप्रमाणें अंदाजपत्रक बनवितां येईल.

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

महाराष्ट्र बँकेला १९५८ मध्यें ५.५६ लक्ष रु. नफा झाला. भागदारांना ६½% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. गेल्या वर्षीं बँकेकडील ठेवी ७.८५ कोटी रुपयांच्या १०.६० कोटी रुपयांवर गेल्या.

---

### बाँबे स्टेट को. युनियनची नवी एक्झिक्यूटिव्ह कमिटी

१९५८-६० ह्या मुदतीकरतां बाँबे स्टेट को. युनियनचे, युनियनच्या २१ व्या बायलॉप्रमाणें, पदाधिकारी व सभासद खालीलप्रमाणें असतील:—

श्री. वैकुंठराय मेहता, चेअरमन. श्री. व्ही. पी. वर्दे, व्हाइस-चेअरमन. श्री. धिरजलाल शहा, ऑनररी सेक्रेटरी. सर्वश्री. एच. एच. शहा, डी. एम. निकम, डी. जे. झुंजारराव, ललितमोहन वकील, डॉ. बी. बी. पिंगळे, एल. एच. पटेल, डी. एम. मेहता, कुमार श्री. उदयभानसिंहजी, घनःशाम ओझा, एम. एन. काका, एन. आर पटेल, एस. एस. दंडिगे, डब्ल्यु. टी. वासु, ए. एच. कुलकर्णी, जे. एल. मेहता, जे. के. मोदी, एम. पी. कोल्हे, प्रा. एम. आर. पाळंदे, डॉ. ए. यू. शेख (रजिस्ट्रार, सहकारी सोसायट्या). नागपूर आणि विदर्भ को. इन्स्टिटयूटसचें डिव्हिजनल को. बोर्डीत रूपांतर झाल्यानंतर त्यांचे प्रत्येकीं एक अशा दोन प्रतिनिधींची कमिटींत भर पडून तिच्या एकूण सभासदांची संख्या २४ होईल.

---

### महाराष्ट्र बँकेचे तुलनात्मक आंकडे

| | १९५७ अखेर रु. | १९५८ अखेर रु. |
|---|---|---|
| वर्षांतील नफा | ४,६९,००० | ५,५६,६०० |
| मागील शिलकी नफा | ३२,००० | ३६,१०० |
| नफा वांटणीसाठी रक्कम | ५,०१,००० | ५,९२,७०० |
| करासाठी तरतूद | २,१०,००० | २,५०,००० |
| रिझर्व्ह फंडांत जमा | १,५०,००० | १,५०,००० |
| डिव्हिडंडचा दर | ६% | ६½% |
| डिव्हिडंडची रक्कम | १,०५,००० | १,५५,००० |
| पुढील वर्षांतील हिशेबांत | ३६,१०० | ३७,७०० |
| नोकरवर्गास बोनस | ७०,००० | १,१०,००० |
| ठेवी | ७,८५,००,००० | १०,६०,००,००० |
| इन्व्हेस्टमेंटस | २,५६,००,००० | ४,८१,००,००० |
| कर्जे | ३,८३,००,००० | ४,४९,००,००० |
| खेळतें भांडवल | ९,२५,००,००० | १२,३५,००,००० |

---

### श्री महालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

१,३९,७७० रु. वसूल भांडवल; ५४,२४३ रु. रिझर्व्ह फंड; ५५,२३१ रु. इतर फंड; ठेवी १४,६३,२८६ रु., रोख व बँकांत ३,९९,००६ रु; इन्व्हेस्टमेंटस ४,७३,१२४ रु., कर्जे ८,२१,४०९ रु., असे बँकेच्या व्यवहाराचे प्रमुख आंकडे आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस १२,४३५ रु. निव्वळ नफा झाला. ४% डिव्हिडंडला ५,४८९ रु. लागले.

(चेअरमन: दा. श्री. मुनीश्वर, बी. ए., बी. टी. इन्चार्ज मॅनेजर: गो. बा. कुलकर्णी)

## गुलछडी आणि ॲस्टर

### व्यापारी फुलझाडें

मुंबई आणि पुणें येथील फुलांच्या बाजारांत निदान दोन तरी मोटार ट्रक्समधून गुलछडी आणि ॲस्टरच्या करंड्या उतरून घेत असल्याचें दृश्य प्रतिदिन पहावयास मिळतें. हीं फुलें सबंध वर्षभर पुणें जिल्ह्यांतील जुन्नर तालुक्यामधून येत असतात. त्यांची काळजीपूर्वकरीत्या वर्गवारी करण्यांत येऊन नंतर ती बांधून पाठविलीं जातात. तेव्हां अशा रीतीनें हजारों रुपयांची उलाढाल यासाठीं होते. या तालुक्याच्या शेतकऱ्यांना फुलांच्या या दोन जाती म्हणजे पैशाचीं फुलझाडें आहेत.

### गुलछडीची लागवड

सऱ्या-वरंब्याच्या पद्धतीनें गुलछडीच्या रोपांची लागण करण्यांत येते. दोन वरंब्यांमध्यें १½ फूट तर दोन रोपांमध्यें एक फुटाचें अंतर ठेवण्यांत येतें. मे ते जूनपर्यंत रोप लावणीचा हंगाम असतो. प्रत्येक चोड्याप्रमाणें तीन ते चार कंद, सऱ्यांमध्यें चार इंच खोल अंतरानें लावण्यांत येतात. प्रत्येक कंदाचा व्यास जवळ जवळ एक इंचाचा असून तो अळूच्या आकाराचा असतो. एक एकर जमिनीसाठीं सुमारें ४० बं. मण कंदांची आवश्यकता असते. कंद भरलेल्या एका पोत्याचें वजन सुमारें १½ बं. मण इतकें असतें. आणि एका एकरांत लागवड करण्यासाठीं अशा प्रकारची जवळ जवळ २७ पोतीं तरी लागतात. एका पोत्याची किंमत ६ ते १० रुपयांपर्यंत असते. हे कंद सतत तीन वर्षांपर्यंत फुलें देतात. नारायणगांव हें तालुक्यांतील सर्वांत महत्त्वाचें असें केंद्र असून या विभागांतील ९० टक्के शेतकरी स्वतःचे बियाणें वापरतात. तालुक्याबाहेरील शेतकऱ्यांस बियाण्याची आवश्यकता असेल तर तो १६० ते २७० रुपये देतो. सर्वसाधारणतः पुणें, नाशिक, संगमनेर आणि अहमदनगर येथील शेतकरीच बियाण्याचें कंद खरेदी करतात. मुंबई येथील ठोक विक्रेते एका एकरासाठीं शेतकऱ्यांना नेहमीं शंभर रुपये आगाऊ देतात आणि हंगामामध्यें शेतकरी संबंधित ठोक विक्रेत्यांना आपलीं फुलें पाठवून देतात.

### खत देणें

जेव्हां नव्यानेंच लागण करण्यांत येते त्यावेळीं एकरीं सुमारें २७ गाड्या शेणखत घालण्यांत येतें. या पिकास सबंध वर्षभरांत सुपर फॉस्फेट, अमोनियम सल्फेट आणि भुईमूगपेंड यांचें दोन हंड्रेडवेट खत तीन हप्त्यांत देण्यांत येतें. प्रत्येक हप्ता देतेवेळीं खताचा सारखा भाग करण्यांत येतो. खत रोपाभोंवती पसरवून तावडतोब पाणी देण्यांत येतें. प्रत्येक महिन्याला शेतांत बेणणी करून माती ढवळण्यांत येते. सर्वसाधारणतः शेतांत खत देण्यापूर्वीं बेणणी करण्यांत येते. प्रत्येक तीन महिन्यानंतर खताचा हप्ता देण्यांत येतो.

### पाणी देणें

नारायणगांवांतील बऱ्याच बागांना मिना नदीचें पाणी देण्यांत येतें. हा पक्का बंधारा असल्याकारणानें एकरीं ८ ते ९ रुपये जमीनमहसूल आकारण्यांत येतो. शेतकरी लोक स्वतः कालवा साफ करून त्यांतील गाळ काढून टाकतात. पिकास विहिरींचें पाणी देण्यांत येत असेल तर पाणीपाळी ८ ते १० दिवसाची असते. कालव्याचें पाणी देण्यांत येणाऱ्या पिकाच्या बाबतींत ही पाणीपाळी १५ दिवसांची असते; पाऊस नसेल त्यावेळीं शेतां एक अथवा दोन वेळा तरी पाणी देण्याची आवश्यकता असते. रबी हंगामांत म्हणजे ऑक्टोबरनंतर पिकास आठ दिवसांच्या अंतरानें विहिरींचें पाणी तर १५ दिवसांच्या अंतरानें कालव्याचें पाणी देण्यांत येतें.

### किडी आणि रोग

रोपाच्या देठांत आणि पानास मुख्यतः अकड्या रोगाचा प्रादुर्भाव असतो. या रोगामुळें देठ वांकले जाऊन फुलें गळून पडतात, तसेंच पानाच्या खालील भागांवर बुरशी वाढलेली दिसून येते. यांवर प्रतिबंध म्हणून शेतकरी लोक, विरघळणारें पन्नास टक्के बी. एच. सी. अथवा हेक्झाडॉल ९५० हें २० गॅलन पाण्यांत १ रत्तल या प्रमाणांत मिसळून फवारतात. रोग जर अधिक प्रमाणावर असेल तर विशेषतः पावसाळ्यांत तीव्र द्रावण तयार करण्यांत येतें.

### हंगाम व माल विक्रीची तयारी

रोपलावणी नंतर तीन महिन्यानें फुलें येतात आणि प्रत्येक शेतांत पीक ३ ते ४ वर्षांपर्यंत राहतें. मार्च ते मे महिन्यापर्यंत फुलें तोडण्याचा हंगाम असतो. कारण यावेळीं फुलांना चांगली किंमत असते. प्रत्येक कंदापासून पुष्पांनीं डवरणारें एक झाड तयार होतें. फुलांची तोडणी पूर्ण झाल्यानंतर हीं झाडें छाटण्यांत येऊन जनावरांना वैरण म्हणून वापरतात. त्यानंतर बुडापासून दुसरा पुष्पसमुदाय बाहेर पडतो. दररोज पहाटें ४ ते ६ वाजेपर्यंत फुलें तोडण्यांत येतात. हा माल सकाळीं ९ वाजेपर्यंत पुण्यास तर मुंबईस दुसऱ्या दिवशीं सकाळीं मिळतो. मुंबईस पाठविण्यांत येणारीं फुलें टोपल्यामध्यें रचून पाठविलीं जातात. पुण्यास पाठविण्यांत येणाऱ्या १ मण फुलास एक रुपया तर मुंबईस पाठविण्यांत येणाऱ्या १६ शेराच्या एका गठ्ठयास आठ आणे याप्रमाणें वाहतुक खर्च येतो. तीन ते चार वर्षें पीक घेतल्यानंतर पुढील दोन वर्षें शेतांत जिराईत पिकें घेतलीं जातात. सर्वसाधारणतः बाजरी, ज्वारी व भुईमूग यासारख्या कोरड्या पिकांची पेरणी करण्यांत येते. नारायणगांव येथें रेल्वे बुकींग ऑफीस असलें तरी शेतकरी लोक मालाचे गठ्ठे मोटारीनें पाठवितात. कारण मोटारीनें पाठविलेला माल मुंबईस वेळेवर जाऊन पोहचतो याबद्दल त्यांची खात्री असते. आर्वी, पिंपळवंडी आणि न खतवाडी येथून अधिक प्रमाणावर गुलछडी पाठविण्यांत येते. फुलाची टोपली रेल्वेनें अथवा ट्रकसनीं विनामूल्य परत पाठविली जातात.

### उत्पन्न

लागवडीचा प्रतिसाल एकरीं ४०० ते ५०० रुपये खर्च येतो तर निव्वळ नफा ८०० ते १,००० रुपयांपर्यंत मिळतो. प्रत्येक शेतकऱ्याजवळ लागवडीची १० गुंठे ते एक एकर इतकी जमीन आहे. जुन्नर तालुक्यांत सुमारें ८०० ते १,००० एकर जमीन गुलछडीच्या लागवडीखालीं आहे तर ४०० ते ५०० एकर जमीन ॲस्टरच्या लागवडीखालीं आहे.

### ॲस्टरचीं रोपें

एप्रिल आणि मे महिन्यांत गादी वाफ्यांवर बियाण्याचें चार कंद फेंकून पेरण्यांत येतात. या गादी वाफ्यांत शेणखत दिलेलें असतें. सुमारें १½ ते २ महिन्यानंतर रोपलावणी करण्यांत येते. उन्हाळ्यांत जर पाण्याची कमतरता असेल तर रोपलावणी जूनपर्यंत पुढें ढकलण्यांत येऊन नंतर ती पुढें जूनपासून ते ऑक्टोबरपर्यंत चालू ठेवण्यांत येते.

### लावणी व आंतरमशागत

जुन्नरमध्यें शेंदऱ्या (ऑरेंज) ॲस्टर, चायना ॲस्टर व

पांढरा ॲस्टर या विविध जातींच्या फुलांची वाढ होते. ॲस्टरचें बियाणें फक्त एक वर्ष टिकूं शकतें. बियाण्याचा विभाग अलगरीत्या राखून ठेवण्यांत आलेला असतो. खरीप व रबी असे रोप लावणीचे दोन हंगाम असतात. बाजरीच्या पिकाची कापणी झाल्यानंतर रबी पिकासाठी लागण करण्यांत येते. रोपलावणी वरंब्याच्या बाजूवर करण्यांत येते आणि सर्वसाधारणपणें प्रत्येक चोंड्यामागें दोन रोपें लावण्यांत येतात. प्रत्येक महिन्यांत बेणणी करण्यांत आल्यानंतर तगरणी करण्यांत येते.

### खत देणें

एक एकर क्षेत्रासाठी १० ते १५ गाड्या शेणखताची आवश्यकता असते. रोपें दोन महिन्यांचीं झाल्यानंतर अमोनिअम सल्फेट, सुपर फॉस्फेट आणि भुईमूग पेंड यांचें प्रत्येकी एक हंड्रेडवेट खत दोन हप्त्यांत विभागून देण्यांत येतें. पहिला हप्ता १½ महिन्यांनीं तर दुसरा हप्ता फुलें येण्याच्या सुमारास दिला जातो. गुलछडीच्या पिकास ज्या पद्धतीनें पाणी देण्यांत येतें तीच पद्धत या पिकाच्या बाबतींत अवलंबिण्यांत येते.

### किडा आणि रोग

रोपांमध्यें सर्वसाधारणतः तांबेरा अथवा खैरा हे रोग आढळून येतात. मावा हा देखील या पिकाचा दुसरा शत्रु असून त्यामुळें रोपांच्या पानांचा रंग तपकिरी बनतो. या रोगासाठीं एकमेव उपाय म्हणजे ५० बी. एच. सी. अथवा हेक्झाडॉल हा होय. या रोगांच्या बाबतींत पॅराझिऑन आणि मॅलाथिऑन हेंहि उपयुक्त आहेत.

### फुलांची तोडणी व गठ्ठेबांधणी

तोडण्यांत आलेलीं फुलें जवळजवळ चार दिवस राहूं शकतात. हंगामांत एका रोपापासून सुमारें ७५ ते १०० फुलें मिळतात. या काळांत चार पांच वेळ फुलांची तोडणी करण्यांत येते. रोपलावणीनंतर पीक सहा महिने टिकून राहतें. प्रत्येक गठ्ठ्यांत १०० याप्रमाणें गठ्ठे बांधण्यांत येतात आणि अशा प्रकारचे ३० गठ्ठे एका टोपलींत असतात. वरच्या बाजूस लिंबाचीं पानें व तरट वापरण्यांत येतें. सबंध दिवसभर फुलें तोडण्यांत येऊन सायंकाळीं त्यांचे गठ्ठे बांधण्यांत येतात. रोपलावणीनंतर तीन महिन्यांनीं फुलें तोडण्यांत येतात. एखादा शेतकरी जास्तींत जास्त २ एकर क्षेत्रांवर लागण करीत असला तरी प्रत्येक शेतकरी सर्वसाधारणतः १० ते २० गुंठे एकर क्षेत्रावर लागण करतो. रबी हंगामांत ज्वारी अथवा हरबरा हीं पिकें आळीपाळीनें घेतलीं जातात तर खरीप हंगामांत ॲस्टरचें पीक घेण्यांत येतें. हेंच पीक जर रबी हंगामांत घेण्यांत आलें तर पुढील खरीप हंगामांत बाजरीचें घेण्यांत येतें.

### उत्पन्न

लागवडीचा एकरीं खर्च २०० रुपये असला तरी त्यापासून मिळणारें उत्पन्न ३५० रुपयांचें आहे. बराचसा माल मुंबईला पाठविला जातो.

लोकांना, घरीं हार करण्यासाठी तसेंच इतर कारणांसाठी दररोज फुलें लागतात. हार करण्यासाठी तसेंच टेबलांवर शोभेसाठी म्हणून गुलछडी आणि ॲस्टर हीं उपयुक्त आहेत. हीं फुलें अधिक काळ टिकून राहत असल्यामुळें त्यांची दूर ठिकाणीं देखील वाहतूक करतां येतें. गुलछडीचें फूल सबंध वर्षभर उपलब्ध असतें, आणि तसेंच या फुलाचा वास मंद नि मधुर असल्याकारणानें त्यास बरीच लोकप्रियता मिळाली आहे. बागबगिच्यांच्या बाबतींत गुलछडी आणि ॲस्टर हीं रोपें सर्वसाधारणपणें आढळत असलीं तरी रोप लावणीकरितां ती फक्त श्रीमंत लोकांनाच उपलब्ध होऊं शकतात. मुंबई, पुणें यांसारख्या शहरांची मागणी जुन्नर तालुक्यांतील शेतकऱ्यांमार्फत पुरविली जाते. या दोन्हीं शहरांच्या आणि जवळपासच्या भागांत या फुलांची आवड सारखी वाढत जावी, असें कोणालाहि वाटेल.

## गेल्या दहा वर्षांतील औद्योगिक प्रगति

### उत्पादनांत वाढ

| | १९४७ | १९५७ |
|---|---|---|
| डिझेल इंजिनें | ६८४ | १६,६६४ |
| शक्तीनें चालणारे पंप | ६,००० | ६३,६७६ |
| विजेच्या मोटर्स | ३८,००० अ. श. | ४,६९,५९० अ. श. |
| रेडिओ रिसिव्हर्स | ३,०३६ | १,९०,६९० |
| विजेचे पंखे | १,६७,००० | ५,२४,६६४ |
| सायकली | ३१,८६० | ७,९०,५७९ |
| शिवण्याचीं यंत्रें | ५,८५६ | १,६७,४७८ |
| सल्फ्यूरिक ॲसिड | ६०,००० टन | १,९६,०६८ टन |
| कॉस्टिक सोडा | ३,३१२ टन | ४२,६५३ टन |
| सोडा ॲश | १३,६२० टन | ९१,९२५ टन |
| शीट ग्लास | ५७ लक्ष चौ. फूट | ५४२ लक्ष चौ. फूट |
| सिमेंट | १४ लक्ष टन | ५६ लक्ष टन |
| पोलाद | ८,९३,००० टन | १३,५०,००० टन |
| कपास–कापड | ३७६ कोटी वार | ५३२ कोटी वार |
| कोळसा | ३ कोटी टन | ४·३५ कोटी टन |


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७७,००,०००चे वर |

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ शॉर्टटर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

### टपाल कचेऱ्यांत बचतीचे पैसे ठेवण्याच्या नव्या सवलती

भारत सरकारनें २ जानेवारी १९५९ पासून पोस्ट ऑफिस संचित मुदतीच्या ठेवींची योजना चालू केल्याचें जाहीर केलें आहे. नियमित उत्पन्न असलेल्या व्यक्तींसाठी ही योजना आंखलेली आहे. या योजनेनुसार पांच किंवा दहा वर्षेपर्यंत दरमहा ठेवी ठेवतां येतील व ठेवींची मुदत पुरी झाल्यानंतर ती सव्याज परत मिळेल. दरमहा १० रुपये ठेवल्यास ५ वर्षांत त्याचे ६५० रुपये आणि १० वर्षांत १४५० रुपये सांचतील. यावर प्राप्तिकर व सुपर टॅक्स माफ करण्यांत येईल.

सेव्हिंग्ज बँकेचा व्यवहार करणाऱ्या सर्व टपाल कचेऱ्यांमार्फत ही योजना कार्यान्वित केली जाईल व तिचा लाभ फक्त व्यक्तींनाच घेतां येईल. दर व्यक्तीस ५ वर्षांकरतां दरमहा जास्तींत जास्त २०० रुपये व १० वर्षांसाठी दरमहा जास्तींत जास्त १०० रुपये गुंतवितां येतील. दोन व्यक्तींच्या बाबतींत संयुक्त ठेवींची ही मर्यादा याच्या दुप्पट असेल. मासिक ठेव ५, १०, २०, ५०, १०० व २०० रुपये याच निश्चित मूल्यांत व कॅलेंडर महिन्यांतून एकदांच स्विकारण्यांत येईल. कांहीं विशिष्ट परिस्थितींत मुदतीआधीं ५० टक्के ठेवींची रक्कम ठेवून रक्कम काढतां येईल. ५ व १० वर्षे मुदतीच्या ठेवींच्या बाबतींत अनुक्रमें ५ व १० वेळां पैसे न भरतां आल्यास त्यांस माफी देण्याचीहि तरतूद केलेली आहे. मुदतीआधींच खात्यांत पैसे भरण्याचें बंद केल्यास मुदत भरल्यानंतर त्या प्रमाणांत पैसे मिळतील. या योजनेचा अधिक तपशील कोणत्याहि पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेकडे किंवा राष्ट्रीय बचत योजनेकडे मिळूं शकेल.

## Govt. Diploma in Co-operation and Accountancy

**Result of Examination held in October, 1958 at Poona.**

*Passed in the whole Examination (including those who have passed in one or the other part previously)*

1st Class:—NIL. 2nd Class:—NIL.

**Pass Class.**

J. C. Soni, Y. K. Kulkarni, L. M. Narappanavar, V. Y. Patki, Kumari Indumati D. Phadke, D. K. Pandya, B. P. Pawade, B. G. Navik, P. N. Patel.

**Passed in Co-operation Group Only**

V. D. Bhonsale, S. B. Joshi, S. K. Deodhar, S. M. Kuray, K. G. Mhaiskar, M. S. Patil.

**Passed in Accountancy Group only:—NIL.**

**Passed in Banking Paper only:—NIL.**

The following candidates have also secured exemptions as detailed below:—

| | Paper No. |
|---|---|
| G. D. Bedadur, | II & IV (Co-operation Group) |
| A. R. Kanade, | III & IV (Co-operation Group) |
| N. C. Parikh | III & IV (Co-operation Group) |
| R. N. Shah, | II & IV (Co-operation Group) |
| D. R. Jedhe, | I only in Accountancy Group. |
| V. N. Wani. | I, III & IV in Accountancy Group. |

Sd. A. U. Shaikh,
Registrar of Co-operative Societies,
Bombay State, Poona, and
Chairman, Co-operation and Accountancy
Diploma Board, Poona—1.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
(स्थापना : १९११)

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फें रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.